# <u>जाहिरातीचा नमुना</u>

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'सार्वजनिक आरोग्य खाते' या विभागाच्या आस्थापनेवरील वैद्यकिय अधिकारी (प्रसुतीगृहे) या संवर्गातील रु.61400-194300 अधिक अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीत खालील तक्त्यात नमूद केलेली पदे अर्हतांना राज्य शासनाच्या मंजुरीसापेक्ष एकावेळी सहा महिन्यांपेक्षा जास्त नाही अशा कालावधीसाठी तदर्थ तत्वावर भरण्यासाठी निवडयादी तयार करावयाची असल्याने खालीलप्रमाणे नमुद केलेली अर्हता धारण करणा-या व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील वैयक्तिक माहितीपत्रांसह तसेच सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रतींसह अर्ज करावा.

**अर्ज पाठविण्याचा पत्ता :- कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय, ३ रा मजला, एफ/दक्षिण विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परेल, मुंबई-४०००१२.**

**अर्ज सादर करण्याची तारीख:- दि.२१.०७.२०२० ते दि. ३१.०७.२०२० या कालावधीत सकाळी १०.३० ते सायं.५.३० या कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावा.**

( शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टी वगळून) **त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.**

<u>पदाचे नाव/वर्ग</u> :

<u>१.वैद्यकिय अधिकारी(**प्रसुतीगृहे**), (वर्ग -अ)   **एकूण रिक्त जागा –४२**</u>

**रिक्त असलेल्या ४२ पदांपैकी ३२ पदे प्रसुतीगृहाकरिता असून सेवानिवासस्थानासह आहेत. नियुक्तीनंतर महापालिकेच्या सेवेत सदर पदावर असेपर्यंत कर्मचा-यास सेवानिवासस्थानात राहणे बंधनकारक आहे. उर्वरित ७ पदे सेवानिवासस्थानासह नसून, उमेदवाराने प्रसुतीगृहातील काम चक्राकार पध्दतीने (On Call on Rotation Basis) कर्तव्यार्थ वैद्यकिय अधिकारी म्हणुन काम करणे आवश्यक आहे.**

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एस.ई.बी.सी. | इ.डब्ल्यू.एस. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | ३ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ५ | ३ | ३ | ७ | २९ |
| **महिला ३०%** | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | २ | १ | ३ | १२ |
| **खेळाडू ५%** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| अनाथ **1%** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकुण** | ५ | ४ | १ | १ | २ | १ | १ | ७ | ५ | ४ | ११ | ४२ |
| दिव्यांग ४% | दिव्यांग करीता ०२ पद आरक्षित असून सदर संवर्गाच्या दिव्यांगाच्या पदनिश्चितीस शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर पदे स्वतंत्ररित्या जाहिरात देऊन भरण्यात येतील.  यास्तव, दिव्यांगांसाठी आरक्षित होणारी ०२ पदे खुल्या गटातून रिक्त ठेवण्यात येतील. | | | | | | | | | | | |

अ) <u>**शैक्षणिक अर्हता**</u>

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी धारण करणारा असावा. तसेच सांविधिक मान्यताप्राप्त विद्यापिठाची/संस्थेची प्रसुतीशास्त्र व स्त्रीरोगशास्त्र यातील पदव्युत्तर पदवी अथवा पदविका धारण करणारा असावा.

२. उमेदवारांकडे  पदव्युत्तर पदवी / पदविका प्राप्त केल्यानंतर सुस्थापित रुग्णालयातील / शुश्रुषालयाच्या प्रसूतीकक्षातील चिकित्सालयीन कामाचा १ वर्षापेक्षा कमी नाही, इतका अनुभव असावा.

३. उमेदवार महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणीकृत असावा.

